# गोल्ड लोनसाठी अर्ज

शिवालिक
शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

प्रति,

**शाखा व्यवस्थापक,**

**शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**

____________________ **(शाखेचे नाव)**

मी/आम्ही याद्वारे सोन्याच्या दागिन्यांच्या/अलंकारांच्या सुरक्षेवर माझ्या रू __________ /-(रुपये ______________)च्या गोल्ड लोनसाठी केलेल्या अर्जाचा विचार करून तो मंजुर करण्याची बँकेला विनंती करत आहे/आहोत:

**कर्जदाराचे छायाचित्र**

| कर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| **कर्जाची रक्कम (रु.)** | **CUID क्रमांक:** | **अर्ज क्रमांक:** |
| | | |

**कर्जदाराचा वैयक्तिक तपशील:**

**कर्जदाराचे नाव:** ______________________________ जन्मतारीख: D D M M Y Y Y Y

पॅन कार्ड: ☐☐☐☐☐☐☐☐☐ क्रमांक/फॉर्म:____________ सध्याच्या निवासस्थानी रहात असलेले वर्ष:__________

लिंग: __________ शैक्षणिक पात्रता:______________________________

वैवाहिक स्थिती: ______________ संपर्काचा पत्ता:______________________________

राज्य:____________ शहर:____________ जिल्हा:____________ पिनकोड: ☐☐☐☐☐☐☐

प्रमुख ठिकाण:______________ कायमचा पत्ता:______________________________

राज्य: __________ शहर:____________ जिल्हा:____________ पिनकोड: ☐☐☐☐☐☐☐

ईमेल:______________________________ संपर्क क्रमांक: ______________

व्यवसाय:______________ एकुण वार्षिक उत्पन्न:______________ राष्ट्रीयत्व: __________

वडिलांचे नाव: ______________________ जोडीदाराचे नाव: ______________________

**नामनिर्देशित व्यक्तीचा तपशील:**

नामनिर्देशित व्यक्तीचे नाव:______________________ नामनिर्देशित व्यक्तीचा दूरध्वनी क्रमांक:______________

नामनिर्देशित व्यक्तीशी नाते:

**नामनिर्देशित व्यक्तीचा पत्ता:** ______________________________

**बँकेचा तपशील:**

बँकेचे नाव:______________________________ बँकेची शाखा: ______________

बँक खाते क्रमांक:______________________________ IFSC कोड: ______________

C-KYC क्रमांक:______________________________

**व्यक्ती: १) छायाचित्रासह ओळखीचा पुरावा २) बँकेच्या KYC धोरणानुसार निवासाचा पुरावा.**

शिवालिक
शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

| तारण ठेवलेल्या वस्तूंचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| संख्या | एकूण वजन (ग्रॅम) | निव्वळ वजन (ग्रॅम) | पाकिट क्रमांक | दागिन्यांचे छायाचित्र |
| | | | | |

मी/आम्ही घोषित करतो आणि आम्हाला माहित आहे की वर नमूद केल्याप्रमाणे सोन्याची शुद्धता किमान १८ कॅरेट आहे. परंतु, शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड द्वारे (''बँक'' असे संबोधण्यात येईल) नियुक्त करण्यात आलेल्या लेखापरीक्षकांद्वारे/मूल्यांकन करणाऱ्या व्यक्तीद्वारे त्याची पुन्हा खात्री करून घेण्याच्या अधीन आहे ज्यांचा निर्णय अंतिम आणि माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक असेल. तारण ठेवलेल्या सोन्याचे मूल्य मागील ३० दिवसांच्या २२ कॅरेट सोन्याच्या इंडिया बुलियन ॲण्ड ज्वेलर्स असोसिएशन लि.(पुर्वीची बॉम्बे बुलियन असोसिएशन लिमि. (बीबीए)) द्वारा निश्चित केलेल्या बंद होणाऱ्या किंमतीच्या सरासरीद्वारे निश्चित करण्यात आले आहे.

**कर्जदाराची स्वाक्षरी**

ओटीपी द्वारे स्वाक्षरी करण्यात आली आहे

**गोल्ड लोनच्या अर्जाची पोचपावती (कर्जदाराच्या स्वाधीन करावी)**

प्रिय महोदय/महोदया,

याद्वारे वरील गोल्ड लोनच्या अर्जाची पोचपावती देण्यात येत आहे. बँकेला आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सादर करण्याच्या अधीन राहून ३ दिवसांच्या आत कर्जाच्या अर्जावर प्रक्रिया करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

**सोने जमा केल्याची पावती**

दिनांक:

CUID क्रमांक:________________ कर्जदाराचे नाव:________________

प्रमुख संपर्क क्रमांक: ________________ शाखेचा कोड:________________

शाखेचे नाव: ________________ शाखेचा पत्ता:________________

**कर्जदाराचे छायाचित्र**

**दागिन्यांचे छायाचित्र**

| तारण ठेवलेल्या वस्तूंचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| संख्या | एकूण वजन (ग्रॅम) | निव्वळ वजन (ग्रॅम) | पाकिट क्रमांक | दागिन्यांचे छायाचित्र |
| | | | | |

हे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तयार करण्यात आलेला दस्तऐवज आहे आणि त्यावर बँक प्रतिनिधींच्या स्वाक्षरीची आवश्यकता नाही.

**कर्जदाराची स्वाक्षरी**

ओटीपी द्वारे स्वाक्षरी करण्यात आली आहे

**मंजूर करण्यात आलेले नियम व अटी**

ए) आम्ही खाली वर्णन करण्यात आलेल्या दिनांक: _ _ /_ _ /_ _ _ _ _ च्या गोल्ड लोनसाठी केलेल्या अर्जाचा संदर्भ देत आहोत.

बी) मी/आम्ही याचा स्वीकार करतो आणि खात्री देत आहोत की कर्जासाठी केलेल्या अर्जातील खाली नमूद करण्यात आलेले सर्वाधिक महत्त्वाचे नियम व अटी आहेत (कर्जासाठी केलेली विनंती बँकेने स्वीकारल्यास, कर्जदाराला कर्जाच्या संदर्भात लागू असतील) आणि त्या अर्जाच्या प्रपत्रा(त्रां) सोबत आणि प्रमाणित अटींसोबत (गोल्ड लोन) वाचाव्यात.

- कर्जदाराचे नाव:-
- कर्जाचा प्रकार: सोन्याचे दागिने/दागिन्यांच्या तारणावर कर्ज
- योजना:
- कर्जाची रक्कम: **रु.**
- कर्जाचा कालावधी: _______________ महिने (प्रमाणित अटींच्या अधीन)
- परतफेडीची वारंवारिता:
- प्रक्रिया शुल्क + जीएसटी: **रु.**
- व्याजाचा दर: द.सा. ________%
- व्याजाच्या दराचा प्रकार: **फिक्स्ड**
- हिशोबाची पद्धती: **सरळ व्याज**
- वितरणाची तारीख:
- **थकबाकीसाठी शुल्क:**
- कर्जाची मुदत संपण्याची तारीख (प्रमाणित अटींच्या अधीन)
- हेतू:
- विमा शुल्क:
- वार्षिकिकृत टक्क्याचा दर:
- लवकर बंद केल्यास शुल्क: **मंजूर कर्जाच्या रकमेच्या ________% पर्यंत.**
- **तारण ठेवलेल्या वस्तू:** कर्जाच्या सुरक्षेसाठी बँकेकडे सोन्याचे दागिने/अलंकार जमा करण्यात आले आहेत आणि तारण ठेवलेल्या वस्तूंमधील फक्त सोन्याच्या घटकाचा मूल्यमापनासाठी विचार करण्यात येईल.

- **मार्जिन:** ''कर्जदार यास सहमत आहे की, गोल्ड सिक्युरिटीच्या मूल्यात घट झाल्यामुळे मार्जिन/लोन टू व्हॅल्यू रेशोमध्ये काही तूट आल्यास त्यासाठी बँकेला कर्जदाराच्या खात्यातून रक्कम डेबिट करण्याचा अधिकार असेल.''

  ''कर्जदाराने निरंतर आधारावर प्रतिनिधित्व केले आहे आणि हमी दिली आहे, असे गृहीत धरण्यात येईल की: (i) कर्जाच्या संपूर्ण कालावधीत बँकेने जारी केलेल्या मंजूरी पत्रात नमूद केलेले मार्जिन/लोन टू व्हॅल्यू रेशो कायम राखण्यात येईल आणि निश्चित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार त्यात काही बदल झाल्यास, कर्जदार बँकेचे समाधान होईल अशा प्रकारे किंवा बँकेने जारी केलेल्या सदर सल्याची पूर्तता करण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा सादर करेल.''

लिलाव: अटींचे उल्लंघन केल्यास बँक आपल्या धोरणानुसार सोन्याचा लिलाव करू शकते.

| शुल्काचे परिशिष्ट (कर वगळता) | |
|---|---|
| **तपशील** | **शुल्क** |
| **प्रोसेसिंग फी + जीएसटी** | **रु.** ____________________ |
| **लिलावाचे शुल्क** | **प्रत्यक्षानुसार** |
| **SOA जारी करण्याचे शुल्क** | **लागू नाही** |

सी) मी/आम्ही कर्जाच्या दस्तऐवजांची प्रत मिळाल्याचे मान्य करत आहोत आणि त्याची खात्री देत आहोत.

डी) कर्जदाराला माहित आहे की पैसे भरल्याच्या सर्व पावत्या फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दिल्या जातात. परंतु, जर छापील स्वरूपात पैसे भरल्याची पावती हवी असल्यास, कृपया त्यासाठी नाममात्र शुल्क भरून आमच्या शाखेतून ती मिळवावी.

ई) येथील संदर्भ आणि त्याच्या अर्थाशी विपरित असल्याखेरीज ''बँक'' या शब्दाचा अर्थ, असा होतो आणि त्यात त्यांचे उत्तराधिकारी आणि नियुक्त व्यक्तींचा यांचा समावेश आहे असे समजण्यात येईल आणि येथील संदर्भ आणि त्याच्या अर्थाशी विपरित असल्याखेरीज ''कर्जदार'' या शब्दाचा अर्थ, त्यांचे कायदेशीर वारस, व्यवस्थापक, प्रशासक, उत्तराधिकारी आणि नियुक्त व्यक्ती असा असेल व त्यांत त्यांचा समावेश आहे असे समजण्यात येईल.

एफ) मला/आम्हाला हे माहित आहे आणि मान्य आहे की मी/आम्ही अर्ज सादर करून कर्जासाठी अर्ज करू शकतो आणि शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (''बँक'' असे संबोधण्यात येईल) हे सदर कर्ज(र्जे) देण्याचे मान्य करू शकतात (प्रत्येक''कर्ज'') आणि त्यावर अर्जासोबत आणि नियम व अटींसोब वाचले असता या नियम व अटींचे (''प्रमाणित नियम व अटी'') आणि सदर पक्षकारांमध्ये देवाणघेवाण करण्यात आलेल्या इतर दस्तऐवजांचे नियंत्रण आहे किंवा असेल. ठळक अक्षरात नमूद केलेल्या परंतु येथे व्याख्या न केलेल्या येथील अटींचा अर्थ अर्जात नमूद केलेल्या आणि कर्जाच्या दस्तऐवजात नमूद केलेल्या नियम व अटी असा असेल. मी याद्वारे येथे नमूद केलेल्या प्रमाणित अटींसह अशा कर्जा(र्जां)वर नियंत्रण ठेवणाऱ्या सर्व नियम व अटी वाचल्या आहेत, मला त्या समजल्या आहेत, मी त्यास सहमत आहे आणि मी त्यांचा स्वीकार करत आहे.

जी) मला माझ्या बँकेने पाठवलेल्या वन–टाइम पासवर्डची (ओटीपीची) पडताळणी करून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शाखेत दस्तऐवजावर प्रत्यक्ष स्वाक्षरी करून मी यानियम व अटींचा स्वीकार केला आहे. मला माहित आहे की ओटीपी द्वारे अशा प्रकारे केलेली पडताळणी किंवा प्रत्यक्ष स्वाक्षरी हा मी या नियम व अटींचा स्वीकार केल्याचा निर्णायक पुरावा असेल आणि त्या माझ्यावर बंधनकारक असतील.

**कर्जदाराची स्वाक्षरी**

ओटीपी द्वारे स्वाक्षरी करण्यात आली आहे

## सर्वसाधारण नियम व अटी

**१. कर्जाचे वितरण**

१.१ मला/आम्हाला हे माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की आम्ही केलेल्या सादरिकरणानुसार तारण वस्तूंवर बँक कर्ज देण्याची शक्यता आहे.

१.२ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की याद्वारे बँकेला जास्तीत जास्त १२ महिन्यांच्या कालावधीसाठी कर्ज देण्याची विनंती करतो, जे बँकेच्या वेळोवेळी लागू असलेल्या धोरणांच्या अधीन असेल. परंतु, मला/आम्हाला हे माहित आहे की, कर्जाचे सुरूवातीला कर्जाचे वितरण हे फक्त अर्जात नमूद केलेल्या (कर्जाची मुदत संपण्याच्या तारखेसह) कालावधीसाठी असेल. बँकेच्या निर्णयानुसार आणि नूतनीकरणासंबंधी धोरणानुसार स्वतंत्रपणे कर्जाचे नूतनीकरण केले जाईल.

१.३ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की जर बँकेने माझी कर्जाची विनंती स्वीकारली आणि कर्ज मंजूर केले, तर बँक माझ्या बँकेतील खात्यात कर्ज वितरित करण्याची शक्यता आहे.

**२. व्याज, इतर थकीत शुल्क आणि पैसे भरणे:**

२.१ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की कर्जा(र्जां) वरील व्याज आणि शुल्क कर्जाच्या दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे आकारण्यात येईल आणि मी त्याचा स्वीकार करत आहे आणि यास सहमत आहे की नमूद करण्यात आलेला व्याजाचा दर वाजवी आहे आणि बँकेने स्पष्ट केल्यानुसार आहे.

२.२ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की कर्जाच्या संदर्भातील सर्व कर, आकार, शुल्क (मुद्रांक शुल्कासह) आणि संबंधित नोंदणी आणि दाखल करण्याचे शुल्क (लागू असेल त्याप्रमाणे) मी भरेन आणि बँकेने माझ्या वतीने असा कोणताही खर्च केल्यास, मी बँकेला त्याची त्वरित परतफेड करीन.

२.३ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की लागू असेल त्याप्रमाणे, ३६५/३६६ दिवसांचे वर्ष गृहीत धरून, प्रत्यक्ष किंवा कमी होणाऱ्या शिल्लक रकमेवर व्याज आकारण्यात येईल आणि अन्यथा तसे निश्चित केले असल्याखेरीज मासिक कालांतराने व्याज देय असेल.

२.४ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की मी कर्जाचे सर्व वितरण/कर्जाची परतफेड/व्याजाची परतफेड आणि इतर सर्व व्यवहार (मुक्तपणे हस्तांतरणीय निधीमध्ये, कोणत्याही सेट ऑफशिवाय, प्रति दावा किंवा कोणत्याही कपातीशिवाय) संबंधित देय तारखेला किंवा तत्पूर्वी करीन आणि पैसे भरण्याची तारीख कामकाजाचा दिवस नसल्यास, मी त्याच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी पैसे भरण्यास सहमत आहे.

२.५ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की तारण ठेवलेल्या वस्तू आणि मी बँकेला दिलेली इतर कोणतीही सुरक्षा मी बँकेला संपूर्ण देय रकमेची परतफेड केल्यानंतरच मुक्त करण्यात येईल.

**३. तारण वस्तू:**

३.१ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही  सहमत आहोत की आम्ही/मी बँकेकडे सीलबंद पाकिटात त्यांच्या ताब्यात दिलेले, गहाण ठेवलेले, आणि ज्यावर त्यांचा प्रथम आणि पूर्ण अधिकार आहे (''गहाण ठेवलेल्या वस्तू'') असे सोन्याचे दागिने/अलंकार (अशा सोन्याच्या दागिन्यांना/अलंकारांना जोडलेले कोणतेही खडे किंवा हिऱ्यांसोबत) यांचे पूर्ण मालक आहोत आणि बँकेच्या नावे केलेल्या अधिकारांशिवाय त्यावर कोणताही धारणाधिकार, भार, शुल्क किंवा दावे नाहीत.

३.२ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, कोणतीही सूचना किंवा माहिती न देता, बँकेला कर्जाच्या कालावधीत सदर सीलबंद पाकिट उघडण्याचा आणि माझी जोखीम आणि खर्चाने, कोणत्याही वेळी तारण ठेवलेल्या वस्तूंच्या गुणवत्तेच्या संबंधात तपासणी करण्याचा अधिकार असेल (ज्यात तारण वस्तू वितळविणे/कापणे/विध्वंसक चाचण्या किंवा इतर चाचण्यांचा समावेश आहे, परंतू त्याला तितकीच मर्यादा नाही) आणि मी याद्वारे त्यासाठी संमती देत आहे. मला हे माहित आहे आणि मी यास सहमत आहे की आणि मान्य करत आहे की बँकेचे निष्कर्ष अंतिम आणि बंधनकारक असतील आणि मी त्यावर कोणत्याही प्रकारे विवाद निर्माण करणार नाही.

३.३ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, तारण ठेवलेल्या वस्तू आणि मी बँकेला दिलेली इतर कोणतीही सुरक्षा बँकेचे समाधान होईल अशा प्रकारे मी थकबाकीची संपूर्ण रक्कम भरल्यानंतरच मुक्त करण्यात येईल.

३.४ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, तारण ठेवलेल्या वस्तूंचे माझे शीर्षक सदोष नाही किंवा त्याविरूद्ध कोणत्याही प्रकारे आव्हान देण्यात आलेले नाही किंवा ते बनावट अथवा निकृष्ट दर्जाचे नाही.

३.५ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, चोरी, घरफोडी इत्यादींमुळे तारण ठेवलेल्या वस्तूंचे नुकसान झाल्यास, बँकेची सर्व थकबाकी समायोजित केल्यानंतर, हरवलेल्या तारण वस्तूच्या बदल्यात बँकेच्या नोंदीनुसार तारण ठेवलेल्या वस्तूतील सोन्याच्या मूल्याच्या समतुल्य रोख रक्कम देण्यापुरते (वस्तूतील हिरे आणि खडे इ.ची किंमत वजा करून) बँकेचे दायित्व मर्यादित आहे. वजन आणि शुद्धतेनुसार (बँकेच्या रेकॉर्डमध्ये असल्याप्रमाणे) आणि प्रसिद्ध आकडेवारीनुसार सोन्याच्या वर्तमान तारखेच्या किंमतीने गुणाकार करून बदली किंमत निश्चित करण्यात येईल आणि ती अंतिम आणि माझ्यावर बंधनकारक असेल.

३.६ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, बँकेच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे, जसे की आग, पूर, भूकंप इत्यादी सारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे तारण ठेवलेल्या वस्तूंचे कोणतेही नुकसान/हानी झाल्यास बँकेचे कोणतेही दायित्व असणार नाही आणि अशा परिस्थितीत, मी/आम्ही विमा दाव्याच्या सेटलमेंटद्वारे बँकेला पैसे मिळाल्यास आणि जेव्हा मिळतील तेव्हा मला/आम्हाला सदर भरपाई मिळेल.

**४. तारण वस्तूंचे मूल्यांकन:**

४.१ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, बँकेने अधिकार दिलेल्या आणि नियुक्त केलेल्या परीक्षकाद्वारे तारण वस्तूंचे मूल्यांकन करण्यात येईल आणि बँकेने निर्धारित केलेले आणि वेळोवेळी सुधारित मार्जिन विचारात घेतल्यानंतर सदर परीक्षकाने निश्चित केलेल्या तारण वस्तूंच्या मूल्याच्या आधारावर बँकेद्वारे कर्जाची रक्कम निर्धारित केली जाईल. सदर मूल्य हे तारण ठेवलेल्या वस्तूच्या वेळोवेळी असलेल्या बाजारमूल्याच्या अधीन असेल. तारण ठेवलेल्या सोन्याचे मूल्य भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी विहित केल्यानुसार, ज्यात वेळोवेळी बदल होतात, अशा इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन लिमिटेड (पूर्वीची बॉम्बे बुलियन असोसिएशन लिमिटेड (बीबीए) म्हणून प्रसिद्ध) यांनी नमूद केलेल्या मागील ३० दिवसांच्या २२ कॅरेट सोन्याच्या दिवसअखेरच्या किंमतीच्या सरासरीनुसार निश्चित करण्यात आले आहे.

४.२ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, बँकेने ठेवलेल्या रेकॉर्डमधील तारण वस्तूंचे मूल्य मला स्वीकारार्ह, निर्णायक, अंतिम आणि माझ्यावर बंधनकारक आहे आणि कोणत्याही वेळी, कोणत्याही प्रकारे त्याविषयी वाद निर्माण करता येणार नाही.

४.३ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, बँकेने माझ्यासाठी कर्ज मंजूर केले याचा अर्थ असा नाही की, बँकेकडे तारण ठेवलेले सोन्याचे दागिने/अलंकार विशिष्ट कॅरेट शुद्धतेचे असल्याची बँकेने खात्री दिली आहे आणि त्याचा स्वीकार केला आहे.

४.४ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, जर तारण ठेवलेल्या वस्तू बनावट किंवा नकली किंवा कमी शुद्धतेच्या किंवा चोरीच्या आहेत असे आढळले, तर माझ्याविरुद्ध योग्य तपास/गुन्हेगारी कारवाई सुरू करण्याचा बँक अधिकार राखून ठेवत आहे आणि यामुळे बँकेचा झालेला खर्च आणि नुकसान यास मी पूर्णपणे जबाबदार असेन.

४.५ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, तारण ठेवलेल्या वस्तूंतील फक्त सोन्याचा घटक कोणत्याही मूल्यमापनासाठी विचारात घेतला जाईल आणि गहाण ठेवलेल्या वस्तू हरविल्यास त्या बदलून देण्याच्या वेळेसह कोणत्याही वेळी बँक सोन्याच्या दागिन्यांमध्ये/अलंकारांमध्ये बसविलेले खडे किंवा हिऱ्याच्या मूल्याचा विचार करणार नाही.

**५. मार्जिन:**

५.१ ''कर्जदार यास सहमत आहे की, गोल्ड सिक्युरिटीच्या मूल्यात घट झाल्यामुळे मार्जिन/लोन टू व्हॅल्यू रेशोमध्ये काही तूट आल्यास त्यासाठी बँकेला कर्जदाराच्या खात्यातून रक्कम डेबिट करण्याचा अधिकार असेल.''

''कर्जदाराने निरंतर आधारावर प्रतिनिधित्व केले आहे आणि हमी दिली आहे, असे गृहीत धरण्यात येईल की: (i) कर्जाच्या संपूर्ण कालावधीत बँकेने जारी केलेल्या मंजूरी पत्रात नमूद केलेले मार्जिन/लोन टू व्हॅल्यू रेशो कायम राखण्यात येईल आणि निश्चित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार त्यात काही बदल झाल्यास, कर्जदार बँकेचे समाधान होईल अशा प्रकारे किंवा बँकेने जारी केलेल्या सदर सल्याची पूर्तता करण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा सादर करेल.''

५.२ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, तारण वस्तूंच्या मूल्यावर नियमितपणे देखरेख ठेवण्यात येईल आणि जर तारण ठेवलेल्या वस्तूंचे मूल्य मार्जिन आवश्यकतांपेक्षा कमी झाल्यास बँक तितक्या प्रमाणात वजनाची/मूल्याची अतिरिक्त सुरक्षा निर्माण करण्याची किंवा कर्जाची अंशात्मक अथवा पूर्ण परतफेड करण्याची मागणी करू शकते अशी मागणी केल्यास मी त्यानुसार तातडीने त्या आवश्यकतेचे पालन करेन.

५.३ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, येथे काहीही नमूद केले असले तरी सुद्धा, मी व्याज/शुल्कासह कर्जाची रक्कम देय तारखेच्या आत परतफेड करण्याच्या बाबतीत किंवा बँकेने मागणी केल्याप्रमाणे वस्तूंचे तारण ठेवलेल्या मूल्याच्या मार्जिन आवश्यकतांमधील तूट भरून काढण्याच्या बाबतीत काही हलगर्जीपणा केल्यास, किंवा या नियम व अटींच्या अंतर्गत माझ्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याच्या माझ्या क्षमतेवर मूलभूत परिणाम होऊ शकेल अशा कोणत्याही परिस्थितीत, बँकेला माझ्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्याचा आणि/किंवा कर्जाचा कालावधी पूर्ण होण्याच्या अगोदर देखील, अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर मला ७ दिवसांची आगाऊ सूचना देऊन, कोणत्याही वेळी तारण ठेवलेल्या वस्तूंची लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्याचा कायदेशीर अधिकार आहे. मी याद्वारे यास सहमत आहे आणि त्यास संमती देत आहे आणि कोणत्याही वेळी कोणत्याही प्रकारे त्या बाबतीत वाद निर्माण करणार नाही.

५.४ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, बँकर्स म्हणून बँकेला कायद्याने असलेल्या कोणत्याही सामान्य धारणाधिकार किंवा तत्सम अधिकाराबरोबर, बँकेला असलेले माझे दायित्व आणि अशा कोणत्याही एका किंवा अधिक खात्यांच्या क्रेडिटमध्ये असलेली, बँकेला कोणत्याही खात्यात किंवा कोणत्याही संदर्भात, माझ्या/आमच्या असलेल्या दायित्वांची पूर्तता करण्यासाठी कोणतीही रक्कम किंवा रकमा जमा करणे किंवा हस्तांतरित करण्यास, मग ते दायित्व प्रत्यक्ष किंवा आनुषंगिक, प्राथमिक किंवा तारण स्वरूपाचे आणि अनेक किंवा संलग्न असले तरी त्यासह, बँक कोणत्याही वेळी आणि मला/आम्हाला सूचना न देता माझी/आमची सर्व किंवा कोणतीही खात्री एकत्र किंवा संघटित करू शकते.

**६. करार:**

६.१ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की, मी कर्जाच्या दस्तऐवजांतील कोणत्याही नियम व अटींचे उल्लंघन केल्यामुळे किंवा कर्ज किंवा तारण वस्तूंच्या संदर्भात कोणतीही चुकीची माहिती सादर केल्यामुळे बँकेचे काही नुकसान, खर्च, शुल्क, हानी झाल्यास आणि दायित्व निर्माण झाल्यास (तिसऱ्या पक्षाच्या दाव्यासह) त्यासाठी बँकेला नुकसानभरपाई देईन, नुकसानीपासून बचाव करेन किंवा कोणतीही हानी पोहोचू देणार नाही. मला माहित आहे आणि मी यास सहमत आहे की, मी विम्याचा खर्च, अंमलबजावणीचा खर्च, सर्व करांची थकबाकी आणि सरकारचे इतर कोणतेही शुल्क वगैरे सह कर्जाच्या संबंधात कोणत्याही खर्चाची कोणताही विलंब न करता, हरकत न घेता किंवा विरोध न करता परतफेड देखील करीन.

६.२ मला माहित आहे आणि मी यास सहमत आहे की मी कोणत्याही स्वरूपात सोन्याच्या खरेदीसाठी या निधीचा उपयोग करणार नाही (प्राथमिक सोने, गोल्ड बुलियन, सोन्याचे दागिने/अलंकार, सोन्याची नाणी, गोल्ड एक्स्चेंज ट्रेडेड फंडांचे युनिट्स (ईटीएफ) आणि गोल्ड म्युच्युअल फंडांचे युनिट्ससह). मला माहित आहे आणि मी यास सहमत आहे की मी कर्जाच्या अर्जात नमूद केलेल्या उद्देशासाठीच कर्जाच्या रकमेचा उपयोग करेन.

६.३ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत आणि आम्ही याचा स्वीकार करतो की कर्जाच्या दस्तऐवजांमध्ये काहीही समाविष्ट असले तरी सुद्धा मी/आम्ही या कर्ज व्यवस्थेच्या अंतर्गत भरलेल्या कोणत्याही पैशाचा बँकेद्वारा खालील पद्धतीने विनियोग केला जाईल:

ए) मुद्दल रकमेची वसुली;
बी) देय व्याज आणि सर्व बाकी आणि देय रकमा.
सी) खर्च, शुल्क आणि इतर खर्च.

६.४ मी/आम्ही कर्जाच्या अर्जात सादर केलेल्या माहितीत कोणतेही बदल किंवा फेरफार झाल्यास बँकेला त्याची त्वरित लेखी माहिती कळवण्यास सहमत आहे/आहोत.

६.५ मला/आम्हाला हे माहित आहे आणि आम्ही सहमत आहोत की मी बँकेला वेळोवेळी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे/माहिती सादर करेन आणि बँक स्वत: किंवा तिच्या एजंटद्वारा, कोणतीही दिलेली माहिती, क्रेडिट संदर्भ, नोकरीची माहिती यांची पडताळणी करू शकते आणि बँकेने वेळोवेळी आवश्यक वाटेल त्यानुसार, कोणतीही क्रेडिटची माहिती मिळवू शकेल.

**०७. डीफॉल्टच्या घटना:** मला माहित आहे, सहमत आहे आणि याचा स्वीकार करतो की खालील गोष्टींचा डीफॉल्टच्या घटनांमध्ये समावेश असेल:

७.१ व्यवहाराच्या दस्तऐवजांतर्गत कोणतेही पैसे भरण्यात/परतफेड करण्यात (मग नमूद केलेल्या तारखेला, लवकरच्या किंवा अन्यथा तारखेला) डीफॉल्ट झाला.

७.२ मी कोणत्याही कराराच्या कामकाजाच्या संदर्भात डिफॉल्ट (पैसे भरण्यातील डीफॉल्ट व्यतिरिक्त) केल्यास आणि कराराच्या अशा प्रकारच्या उल्लंघनाच्या बाबतीत ३ (तीन) दिवसांत कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत.

७.३ मला, किंवा मी स्वेच्छेने किंवा अनैच्छिकपणे कोणत्याही दिवाळखोरी किंवा नादारी कायद्यांतर्गत कार्यवाहीचा विषय बनू शकेन, अशी वाजवी भीती असेल.

७.४ माझा मृत्यू होणे, किंवा पैसे देणाऱ्या संस्थेच्या संमतीशिवाय माझ्या एकंदरित परिस्थितीत बदल होणे.

७.५ दागिन्यांची चोरी केल्याच्या कारणावरून किंवा दागिन्यांच्या चोरीच्या संशयावरून अटक झाली किंवा तुरुंगात टाकण्यात आले.

७.६ सुविधेची सुरक्षा, काही असल्यास, ती धोक्यात आली असेल किंवा तिचा परिणाम

७.७ मी येथे केलेले कोणतेही निवेदन किंवा विधान किंवा तपशील खोटे, दिशाभूल करणारे किंवा चुकीचे असल्याचे आढळले.

७.८ येथे आणि/किंवा मंजुरी पत्र, सुरक्षा दस्तऐवज, कर्जाचे दस्तऐवज इ. मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही नियम व अटी, दायित्व, प्रतिनिधित्वांचे उल्लंघन करण्यात आले.नष्ट होत असेल.

७.९ कर्जाची परतफेड करण्याच्या किंवा संस्थेच्या बाबतीत जबाबदारी पूर्ण करण्याच्या माझ्या/आमच्या क्षमतेवर विपरित परिणाम करणारी किंवा बँकेच्या हितासाठी प्रतिकूल असणारी कोणतीही परिस्थिती किंवा घटना घडणे.

७.१० तारण ठेवलेल्या वस्तूंच्या गुणवत्तेच्या संदर्भात कोणतीही पद्धतशीर फसवणूक केल्याचे आढळल्यास.

७.११ बाजारभावातील बदलामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे तारण ठेवलेल्या वस्तूंचे मूल्य वेळोवेळी निर्धारित केलेल्या आवश्यक मार्जिनपेक्षा कमी झाले. मला माहित आहे, मी त्यास सहमत आहे आणि मी याचा स्वीकार करत आहे की वरीलपैकी कोणतीही घटना घडल्यास, कर्ज देणारी संस्था खालील पैकी कोणतीही कार्यवाही करू शकते:

ए) मला सुविधेची थकबाकीची रक्कम आणि त्यावरील व्याज आणि व्यवहार दस्तऐवजांनुसार देय असलेली सर्व रक्कम ताबडतोब भरण्यास सांगितले जाईल;

बी) सुविधेच्या संदर्भात माझ्याकडून कोणतीही कृती किंवा चूक झाल्यामुळे आणि/किंवा थकबाकीच्या वसुलीसाठी (कायदेशीर/वकिली शुल्कासह), आणि/किंवा व्यवहाराच्या दस्तऐवजांतर्गत कोणत्याही नियम व अटींचे मी पालन न केल्यामुळे, कर्ज देणाऱ्या संस्थेने केलेले सर्व दावे, मूळ खर्च, तोटा आणि खर्च यांचे पैसे भरण्यास मला सांगण्यात येईल.

सी) तारण ठेवलेल्या वस्तू लिलावाने विकणे.

७.१२ बँकेने मंजूरी पत्रात किंवा अन्यथा नमूद केलेली अशी इतर घटना. कर्जदाराने कोणतीही देय रक्कम किंवा त्याचा कोणताही भाग यांची योग्य प्रकारे परतफेड करण्यात/देण्यात काही डिफॉल्ट केल्यास आणि/किंवा कर्जदार/गहाण ठेवणारी व्यक्ती यांनी तारण करार/व्यवहार/सुविधा दस्तऐवजाच्या तरतुदींनुसार आपली जबाबदारी पार न पाडल्यास, बँकेला, कर्जदार/गहाण ठेवणारी व्यक्ती यांच्या कोणत्याही संमती किंवा अनुमतीची आवश्यकता न राहता, खालील पैकी सर्व किंवा काहीही करण्याचा अधिकार असेल:

ए) कोणतीही घटना घडल्यानंतर, देय रक्कम ताबडतोब देय होईल आणि बँकेला कर्जाची सुविधा परत मागवण्याचा पूर्ण अधिकार असेल.

बी) तारण जारी करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे;

सी) सर्व किंवा कोणत्याही तारण वस्तूंची सार्वजनिक लिलावाद्वारे किंवा बँकेला योग्य वाटेल अशा रीतीने, अशा किंमतीला आणि अशा अटींवर आणि अटींच्या अधीन राहून विक्री करणे किंवा अन्यथा विल्हेवाट लावणे.

तारण ठेवलेले सोन्याचे दागिने/अलंकार बँकेच्या ताब्यात असताना किंवा त्यांची विक्री, वसूली किंवा विल्हेवाट लावताना किंवा इतर कोणत्याही प्रकारे काही तोटा किंवा घसारा झाल्यास त्यास बँक जबाबदार असणार नाही. तारण ठेवलेले सोन्याचे दागिने/अलंकारांची सदर मागणी आणि विक्री कर्जदार/गहाण ठेवणारी व्यक्ती यांच्या खर्चाने असेल आणि अशा मागणी आणि विक्रीमुळे कोणतीही तूट निर्माण झाल्यास कर्जदार/गहाण ठेवणारी व्यक्ती त्याच्या/त्यांच्या स्वत:च्या खर्चाने, जोखीम आणि जबाबदारीने बँकेला त्याची भरपाई करून देईल.

७.१३ बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय मी तारण ठेवलेल्या वस्तूंवर कोणताही ताबा, धारणाधिकार, गहाण किंवा कोणताही भार निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न केला.

७.१४ मुल्यांकनकर्ता आणि माझ्यामधील कोणत्याही संगनमताने सोन्याच्या दागिन्यांचे खोटे आणि चुकीचे मूल्यांकन करण्यात आले किंवा बँकेला या संदर्भात वाजवी शंका आली.

७.१५ माझ्या विरुद्ध किंवा कोणत्याही सुरक्षेविरूद्ध कोणतीही अटॅचमेंट, क्लेशदायक, किंवा इतर पक्रियेची अंमलबजावणी करण्यात आली/आकारण्यात आली.

७.१६ बाजारभावातील बदलामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे तारण ठेवलेल्या वस्तूंचे मूल्य वेळोवेळी निर्धारित केलेल्या आवश्यक मार्जिनपेक्षा कमी झाले.

७.१७ मला/आम्हाला हे माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की मला कामकाजाच्या ७ दिवसांची नोटीस दिल्यानंतर बँकेद्वारा दैनंदिन वृत्तपत्रांमध्ये स्थानिक भाषेत जाहिरात देऊन आणि राष्ट्रीय दैनिकात दुसरी जाहिरात देऊन बँकेकडून लिलाव करण्यात येईल जो भारतीय करार कायदा, १८७२ मधील कलम १७६ अन्वये वाजवी कालावधी असल्याचे मी मान्य करत आहे.

मला माहित आहे की,

- लिलावाच्या वेळी सोन्याची किंमत ही इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन लिमिटेड (पूर्वीची बॉम्बे बुलियन असोसिएशन लिमिटेड (बीबीए) या नावानेप्रसिद्ध) द्वारा जारी करण्यात आलेल्या २२ कॅरेटच्या सोन्याच्या मागील ३० दिवसांच्या दिवसअखेरच्या किंमतीच्या सरासरीद्वारे निश्चित करण्यात येईल.
- लिलावाची किंमत ही बँकेच्या विवेकबुद्धीनुसार बँकेच्या अंतर्गत धोरणानुसार निश्चित करण्यात येईल, लिलावासाठी किमान २ निविदाकारांची आवश्यकता असेल आणि बँकेद्वारा सर्वोच्च बोली स्वीकारली जाईल.

७.१८ मला माहित आहे आणि मी यास सहमत आहे की मला गहाण ठेवलेल्या वस्तूंच्या सार्वजनिक लिलाव करण्याच्या त्यांच्या हेतूची नोंदणीकृत पत्र/कुरिअर सेवा,

एसएमएस किंवा टेलिफोन किंवा वैयक्तिक माहितीद्वारे किंवा ई–मेलद्वारे किंवा संप्रेषणाच्या इतर कोणत्याही माध्यमांद्वारे माहिती कळविण्यात येईल.

७.१९ बँकेद्वारा पुरविण्यात येणारी विविध उत्पादने, ऑफर्स आणि सेवांची माहिती बँक आणि/किंवा तिचे एजंट यांनी मला/आम्हाला कोणत्याही पद्धतीने (टेलिफोन कॉल्स, एसएमएस/ईमेल, पत्रे इत्यादींसह) पाठविण्यास माझी कोणतीही हरकत नाही आणि बँकेला आणि/किंवा तिच्या एजंटसना याचे अधिकार देत आहे. मी खात्रीपूर्वक नमूद करत आहे की, भारतीय टेलीकॉम रेग्युलेटरी ऑथॉरिटी द्वारा ''नॅशनल डू नॉट कॉल रेजिस्ट्री'' अंतर्गत नमूद करण्यात आलेले अनावश्यक संपेषणासंबंधातील कायदे अशा माहिती/ संपेषणासाठी लागू असणार नाहीत.

७.२० मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, लिलावाची प्रक्रिया बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात येईल.

७.२१ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, गहाण ठेवलेल्या वस्तूंच्या विक्रीद्वारे मिळालेल्या पैशांचा कर्जाच्या अंतर्गत देय रकमेची परतफेड करण्यासाठी उपयोग केला जाईल. जर मिळालेले पैसे थकबाकीची रक्कम भरण्यासाठी पुरेसे नसल्यास, माझ्याकडून बाकी रक्कम वसूल करण्यासाठी बँक त्यांना आवश्यक वाटेल त्यानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे. परंतु जर मिळालेली रक्कम ही एकुण थकबाकीच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास, सर्व लागू थकबाकीची देणी समायोजित केल्यानंतर अधिक रक्कम मला परत देण्यात येईल.

७.२२ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, जर काही डिफॉल्ट (हलगर्जीपणा) झाल्यास, बँकेला माझी आणि माझ्या डिफॉल्टची माहिती सामाजिक माध्यमांसह सार्वजनिक डोमेनवर उघड किंवा प्रसिद्ध करण्याचा अपात्र अधिकार असेल.

७.२३ कोणत्याही कायद्यानुसार किंवा करारानुसार त्यांना उपलब्ध असलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यात येईल.

**८. अतिरिक्त सुविधा:**

८.१ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, ऑनलाइन सिक्युरिटी प्लॅटफॉर्मचा (ऑनलाइन कर्ज) उपयोग करून किंवा बँकेच्या टोल–फ्री क्रमांकावर संपर्क साधून मी अधिक/अतिरिक्त सुविधांसाठी (अशा अतिरिक्त कर्जासाठी तारण चालू ठेवून) अर्ज करू शकतो. कर्जदाराने बँकेच्या क्रेडिट संबंधी निकषांची पूर्तता केल्यास, आणि सर्व आवश्यकतेनुसार दस्तऐवज/माहिती सादर करण्याच्या अधीन राहून बँक त्यांच्या स्वत:च्या निर्णयानुसार सदर अतिरिक्त कर्ज देऊ शकते.

८.२ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, मी बँकेकडून वेळोवेळी घेतलेल्या इतर कोणत्याही सुविधांच्या संदर्भात, गहाण ठेवलेल्या वस्तू आणि त्यांच्या विक्रीतून मिळालेल्या कोणत्याही रकमेच्या संदर्भात बँकेला धारणाधिकार आणि वळते (सेट ऑफ) करण्याचा अधिकार असेल.

**९. मुदत संपणे (परिपक्वता) आणि नूतनीकरण:**

९.१ मुदत संपल्यावर, मी/आम्ही एकतर व्याजासह कर्जाची आणि मी/आम्ही बँकेला देणे लागत असलेली अशा इतर रकमांची (''थकबाकी'') परतफेड करू किंवा मी/आम्ही कोणत्याही वेळी बँकेला नूतनीकरणाची/कर्जात वाढ करण्याची विनंती करू, जे बँक मला/आम्हाला तिच्या स्वत:च्या आणि पूर्णपणे त्यांच्या निर्णयानुसार, आणि बँकेच्या नावे सोन्याची सुरक्षा गहाण ठेवण्याच्या अधीन राहून आणि बँकेला आवश्यक वाटेल त्यानुसार अशा इतर सुरक्षेच्या आणि तशा स्वरूपाच्या तरतुदीच्या अधीन राहून देऊ शकते आणि सदर नूतनीकरणाच्या/वाढ करण्याच्या वेळी अस्तित्वात असलेल्या आपल्या धोरणांनुसार व्याजदरात तशा प्रकारे बदल करून बँक सदर कर्ज देऊ शकेल.

**१०. विविध:**

१०.१ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, मी कर्जासाठी केलेल्या अर्जात दिलेल्या पत्त्यावर सर्व लेखी पत्रव्यवहार पाठविण्यात येईल. पत्त्यात किंवा संपर्काच्या माहितीत कोणताही बदल झाल्यास, मी तात्काळ बँकेला त्याची लेखी स्वरूपात माहिती कळवीन, तसे न केल्यास, सदर पत्त्यावर पाठवलेल्या डिमांड नोटिस, लिलावाची नोटिस इत्यादींसह सर्व पत्रव्यवहार मला मिळाले आहेत असे गृहित धरण्यात येईल.

१०.२ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, हा कर्जाचा करार/नियम व अटींच्या संदर्भात कोणतेही विवाद, मतभेद किंवा दावे निर्माण झाल्यास किंवा त्याद्वारे कोणतेही व्यवहार करण्यात आल्यास, किंवा त्यांचे कोणतेही उल्लंघन, खंडित करणे किंवा अवैधता निर्माण झाल्यास, प्रथम ती आर्बिट्रेशन ॲण्ड कन्सिलिएशन कायदा, १९९६ (''कायदा'') अंतर्गत लवादाकडे पाठविण्यात येईल आणि त्याचप्रमाणे इंटरनेटवर आणि ''ज्युपिटिस जस्टिस टेक्नॉलॉजी लिमिटेड'' यांच्या arbitration.jupitice.com या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या जलदगती ई–आर्बिट्रेशनला लागू असलेल्या ''ज्युपिटिस जस्टिस टेक्नॉलॉजी लिमिटेड'' यांच्या नियम व अटींनुसार स्वतंत्र आणि तटस्थ, तिसरा–पक्ष संस्थेद्वारे ऑनलाइन विवाद निराकरणाच्या पद्धतीद्वारे तिचे आयोजन आणि प्रशासन करण्यात येईल.

विवादाचा निकाल देण्यासाठी नियुक्त केलेल्या न्यायाधिकरणात आर्बिट्रेशन ॲण्ड कन्सिलिएशन कायदा, १९९६ आणि ''ज्युपिटिस जस्टिस टेक्नॉलॉजी लिमिटेड'' यांच्या नियमांनुसार नेमण्यात आलेल्या स्वतंत्र एकमेव लवादाचा समावेश असेल. लवादाच्या कार्यवाहीचे ठिकाण गौतम बुद्ध नगर, उत्तर प्रदेश, भारत हे असेल. लवादाचा संपूर्ण खर्च दोन्ही पक्षांनी सारख्या प्रमाणात करावा. लवादाचे सर्व कामकाज इंग्रजी भाषेत केले जाईल आणि लवादाच्या कार्यवाहीचा कायदा हा भारतीय कायदा असेल. न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि दोन्ही पक्षकारांना तो बंधनकारक असेल. ज्युपिटिस जस्टिस टेक्नॉलॉजी लिमिटेडद्वारे लवादाची निवड करण्यात बँकेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही दबाव असणार नाही.''

१०.३ कर्जदाराचा मृत्यू झाल्यास, मुद्दल रक्कम, व्याज, दंडात्मक व्याज यासह संपूर्ण थकबाकीची रक्कम आणि कर्जदार/नामनिर्देशित व्यक्तीच्या मूळ केवायसी कागदपत्रांची पडताळणी करण्याचे शुल्क वसूल केल्यानंतरच सुरक्षा ठेवलेल्या वस्तू नामनिर्देशित व्यक्तीच्या (कर्ज मंजूर करताना नेमून दिलेल्या) स्वाधीन केल्या जातील/मुक्त केल्या जातील.

१०.४ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, बँक, इतर कोणत्याही कराराचा कोणताही परिणाम न होता, त्यांच्या स्वत:च्या निर्णयानुसार,

बँकेने मला दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या अंतर्गत असलेल्या थकित रकमेसाठी बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही उपकंपनी/अनुषंगिक/सहयोगी कंपनीच्या ताब्यात असलेले माझ्या मालकीचे कोणतेही पैसे, रक्कम, सिक्युरिटीज आणि इतर मालमत्ता (स्वतंत्रपणे किंवा इतर कोणाही किंवा इतरांबरोबर संलग्नपणे) यांचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य बँकेला असेल.

१०.५ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, बँकेला माझ्या संपूर्ण जोखमीवर आणि खर्चाने माझी थकित रक्कम जमा करण्यासाठी एक किंवा अधिक व्यक्तीची(व्यक्तींची) नेमणूक करण्याचा अधिकार असेल आणि बँकेला योग्य वाटेल त्यानुसार माझी संबंधित माहिती, वस्तूस्थितीची माहिती आणि आकडेवारी त्यांना देण्याचा अधिकार बँकेला असेल.

१०.६ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, बँक, कोणत्याही वेळी, कर्जाच्या दस्तऐवजांच्या अंतर्गत असलेले त्याचे सर्व किंवा कोणतेही अधिकार, फायदे आणि दायित्वे नियुक्त किंवा हस्तांतरित करू शकते.

१०.७ मला माहित आहे आणि मी यास सहमत आहे की सर्व व्यवहार कर्ज देणाऱ्या संस्थेच्या फक्त कामकाजाच्या दिवशी नेहमीच्या कामकाजाच्या वेळेत केले जातील.

१०.८ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, मला त्याची माहिती देऊन बँकेला कोणतेही नियम व अटी यामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार आहे.

१०.९ मला/आम्हाला माहित आहे आणि त्यास आम्ही सहमत आहोत की, मला देण्यात आलेल्या कर्जाचा वापर करून, मी येथे नमूद करण्यात आलेल्या आणि वेळोवेळी सुधारणा केलेल्या नियम व अटींचा बिनशर्त आणि अपरिवर्तनीयपणे स्वीकार करत आहे आणि मी त्यांचे कायम पालन करीन आणि माझ्यावर त्या कायम बंधनकारक राहतील.

१०.१० **एफएटीसीए:** मला माहित आहे, मी यास सहमत आहे आणि याद्वारे खात्री देत आहे की मी भारताचा नागरिक आणि कायमचा रहिवासी आहे आणि मला भारताची कर प्रणाली लागू आहे. **तारण:** सुविधा सुरक्षित करण्यासाठी सोन्याचे दागिने/दागिने बँकेत जमा करण्यात आले आहेत आणि तारण ठेवलेल्या वस्तूंपैकी फक्त सोन्याचा घटक मूल्यांकनासाठी विचारात घेतला जाईल.

१०.११ तारण: कर्जाची सुरक्षा म्हणून सोन्याचे दागिने/अलंकार बँकेत जमा करण्यात आले आहेत आणि तारण ठेवलेल्या वस्तूंचा फक्त सोन्याचा घटक मूल्यांकनासाठी विचारात घेतला जाईल. बँकेच्या ''योग्य कार्यपद्धतींची संहिता'' याच्या अन्वये हे कर्ज मंजूर करण्यात आले आहे आणि बँकेच्या वेबसाइटवर www.shivalikbank.com येथे ते उपलब्ध आहे. कृपया बँकेच्या खालील लिंकवर क्लिक करून ''योग्य कार्यपद्धतींची संहिता'' वाचा: http:// www.shivalikbank.com/policy/Fair-Lending - Practice-Code-Policy.pdf

**११. थकबाकीसाठी शुल्क:** कर्जाच्या देय रकमेच्या (मुद्दल किंवा व्याज किंवा दोन्ही) परतफेडीत डिफॉल्ट किंवा विलंब झाल्यास. कर्जदार द.सा.______% या दराने थकबाकी शुल्क भरण्यास जबाबदार असेल. वेळोवेळी लागू असलेल्या नियामक मार्गदर्शक तत्त्वांनुसार, थकबाकीची रक्कम जितके दिवस थकीत असेल तितक्या दिवसांसाठी थकबाकीच्या रकमेवर थकबाकी शुल्क लागू होईल.

**१२. मालमत्तेचे वर्गीकरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिसूचनेनुसार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ च्या ''मिळकतीची ओळख, मालमत्तेचे वर्गीकरण अग्रीमसंबंधी आणि वर्गिकरणाशी संबंधित तरतुदी – यासंबंधीचे महत्त्वाचे नियम'' नुसार मी, कर्जदार खालील कर्जाच्या वर्गीकरणाच्या संरचनेची नोंद घेत आहे:

| वर्गीकरण | डीपीडी बकेट रेंज | तपशील |
|---|---|---|
| एसएमए–० | ३० दिवसांपर्यंत | कर्जाच्या खात्याची देय मुदतीची तारीख ३१ मार्च २०२१ असल्यास, आणि त्या तारखेच्या अगोदर – ह्या तारखेच्या अंतिम प्रक्रियेच्या अगोदर संपूर्ण थकबाकीची रक्कम न मिळाल्यास, थकबाकीची तारीख ही ३१ मार्च २०२१ असेल आणि ३१ मार्च २०२१ रोजी त्याचे एसएमए–० असे वर्गीकरण करण्यात येईल. |
| एसएमए–१ | ३० दिवसांपेक्षा अधिक आणि ६० दिवसांपर्यंत | वरील नुसार पुढे, जर खाते पुढे थकित खाते असे राहिले तर ३० एप्रिल२०२१ या तारखेच्या दिवस अखेरची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर म्हणजे संपूर्ण थकित खाते म्हणून ३० दिवस पूर्ण झाल्यास, सदर खात्याचे एसएमए–१ असे वर्गीकरण करण्यात येईल. |
| एसएमए–२ | ६० दिवसांपेक्षा अधिक आणि ९० दिवसांपर्यंत | वरील नुसार पुढे, जर खाते पुढे थकित खाते असे राहिले तर ३० मे २०२१ या तारखेच्या दिवस अखेरची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर म्हणजे संपूर्ण थकित खाते म्हणून ६० दिवस पूर्ण झाल्यास, सदर खात्याचे एसएमए–२ असे वर्गीकरण करण्यात येईल. |
| अकार्यक्षम मालमत्ता (एनपीए) | ९० दिवसांपेक्षा अधिक | वरील नुसार पुढे, जर अजूनही पुढे खाते थकित राहिले तर २९ जून २०२१ ची दिवस अखेरची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खात्याचे एनपीए असे वर्गिकरण करण्यात येईल. एकदा खाते एनपीए झाले म्हणजे ९० दिवस सातत्याने थकित खाते राहिले की, संपूर्ण थकबाकीची रक्कम भरेपर्यंत ते एनपीए राहील* आणि डीपीडी ० होईल. काही अंशात्मक पैसे भरल्यास त्याची एनपीए स्थिती बदलणार नाही. |

***थकित रक्कम ही थकित व्याज किंवा परतफेडीच्या वेळापत्रकानुसार थकित मुद्दल आणि व्याज असेल.**

१३. मी/आम्ही बँकेला (स्वत: किंवा त्यांच्या कोणत्याही सेवा पुरवठाद्वारे, आणि स्वयंचलित पद्धतीने किंवा अन्यथा कोणत्याही पद्धतीने), माझ्या अर्जाचा तपशील, वैयक्तिक माहिती आणि माझ्याबद्दलची संवेदनशील माहिती, तुमच्या ग्राहकाची माहिती करून घ्या (केवायसी) या संबंधी माहिती, क्रेडिट माहिती, कागदपत्रे आणि डेटा आणि बँकेला संबंधित वाटणारी माझ्याबद्दलची/माझ्याशी संबंधित असलेली किंवा नसलेली कोणतीही इतर माहिती, (एकत्रितपणे, ''माहिती'') गोळा करणे, ती साठवून ठेवणे आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी स्पष्टपणे संमती देत आहोत आणि अधिकार देत आहोत आणि गोल्ड लोन अर्जाच्या संदर्भात माझी सी-केवायसी आयडी वापरून सी-केवायसी रजिस्ट्रीमधून केवायसी तपशील डाउनलोड करण्यासाठी बँकेला स्पष्टपणे संमती देत आहोत आणि अधिकार देत आहोत आणि बँकेला सेवा पुरवठादार, सल्लागार, क्रेडिट माहिती कंपन्या, इन्फर्मेशन युटिलिटीज, इतर बँका आणि वित्तीय संस्था, सहयोगी, समुहातील कंपन्या, उपकंपन्या, नियामक, तपासणी एजन्सीज, न्यायालयीन, अर्ध-न्यायिक आणि वैधानिक प्राधिकारी, किंवा इतर व्यक्ती/संस्था/कायदेशीर संस्था यांना, कराराच्या किंवा कायदेशीर आवश्यकतांच्या संदर्भात, आवश्यक असेल त्यानुसार,सदर माहिती देण्यासाठी किंवा बँकेच्या कायदेशीर हितसंबंधात किंवा संमतीनुसार, माहितीवर प्रक्रिया करण्याचे काम हाती घेण्यासाठी, तसेच बँकेला योग्य वाटेल त्यानुसार संचयन, संरचना, आयोजन, पुनर्निर्मिती, प्रत घेणे, उपयोग, प्रोफाइलिंग इत्यादी साठी, आणि त्याचप्रमाणे क्रेडिट मूल्यांकन, फसवणूकीचा तपास, पैशाची अफरातफर विरोधी दायित्वे, करार करणे, थेट विपणन, यासाठी तिचा उपयोग करण्यासाठी स्पष्ट संमती देत आहे. मी बँक, तिचे सेवा पुरवठादार, एजंटस् आणि/किंवा त्यांचे सहयोगी यांनी माहितीचा उपयोग करण्यास आणि विपणनासाठी जाहिरात करण्यासाठी आणि बँकेची विविध उत्पादने आणि सेवांचे मला वेळोवेळी टेलिफोन, एसएमएस आणि/किंवा ईमेल द्वारे क्रॉस सेलिंग केली जाण्यास स्पष्टपणे सहमती देत आहे.

१४. **तक्रार निवारण**

प्रिय कर्जदार, तुमचे काही गाऱ्हाणे किंवा तक्रार असल्यास, कृपया आमच्या ग्राहक सेवा प्रतिनिधीशी संपर्क साधा किंवा तुमच्या जवळच्या शाखेला भेट द्या. तुम्ही तुमची तक्रारी दाखल करण्यासाठी शाखेत उपलब्ध असलेल्या तक्रार पेटीचा किंवा तक्रार फॉर्मचा उपयोग करू शकता. तुमच्या तक्रारीचे निवारण न झाल्यास, कृपया खालील एस्केलेशन मॅट्रिक्सचा उपयोग करा.

**स्तर १: शाखा व्यवस्थापक / फोन बँकिंग क्रमांक / ग्राहक सेवा केंद्र**

कृपया आमच्या व्यवसाय प्रतिनिधीशी संपर्क साधा (बीसीचा संपर्कचा तपशील : https://shivalikbank.com/regulatory-section/notice- board/list-of-business-correspondents) किंवा तुमच्या जवळच्या शाखेच्या कार्यालयातील शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधा किंवा आमच्या फोन बँकिंग ऑफिसरशी टोल फ्री क्रमांक १८००-२०२-५३३३ वर संपर्क साधा किंवा customercare@shivalikbank.com येथे ईमेल पाठवा.

**स्तर २: नोडल अधिकारी**

शाखा/फोन बँकिंग/ग्राहक सेवा केंद्राकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे तुमचे समाधान न झाल्यास किंवा तुम्हाला कामकाजाच्या ७ दिवसांच्या आत त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद न मिळाल्यास, तुम्ही प्रादेशिक नोडल अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकता:

| नोडल अधिकारी | |
|---|---|
| **नोडल अधिकाऱ्याचे नाव:** | **जायत्री सिंघ**<br>शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड<br>दुसरा मजला, ॲड इंडिया टॉवर, प्लॉट नं. ६ए, सेक्टर १२५, नोएडा - २०१३०३. |
| **संपर्काचा तपशील:** | ०१२०-४०६००११ |
| **ई-मेल:** | grievance@shivalikbank.com |

**स्तर ३: प्रमुख नोडल अधिकारी**

नोडल अधिकाऱ्याकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे तुमचे समाधान न झाल्यास किंवा तुम्हाला कामकाजाच्या ७ दिवसांत त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद न मिळाल्यास, कृपया खाली दिलेल्या पत्त्यावर आणि संपर्काच्या तपशीलावर प्रमुख नोडल अधिकाऱ्याशी संपर्क साधा.

आमचे प्रमुख नोडल अधिकारी कामकाजाच्या ७ दिवसांच्या आत तक्रारदाराच्या तक्रारीचे योग्य प्रकारे निवारण करण्याचा प्रयत्न करतील. तक्रारीची चौकशी करण्यासाठी अधिक वेळ आवश्यक असल्यास, तक्रारीची पोचपावती देण्यात येईल आणि प्रतिसादासाठी अधिक वेळेची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करून सांगण्यात येईल.

| प्रमुख नोडल अधिकारी | |
|---|---|
| **प्रमुख नोडल अधिकाऱ्याचे नाव:** | **रवि रत्नाकर सिंघ**<br>शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड<br>दुसरा मजला, ॲड इंडिया टॉवर, प्लॉट नं. ६ए, सेक्टर १२५, नोएडा - २०१३०३. |
| **दूरध्वनी क्रमांक:** | ०१२०-४०६००१२ |
| **ई-मेल:** | pno@shivalikbank.com |

